नियमित दिवाणी दावा क्रमांक ५३/२०२०
निशाणी क्रमांक ७०

**प्रतिवादींचा उलटतपास वादींचे वकील श्री आर. एन. कचरे हयांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

१८. माझे शिक्षण बी. ए. पर्यत झाले आहे. मी १५ वर्षापासुन सहकारी संस्थेत सचिव म्हणुन काम करतो. सुनिता पाटील माझी सख्खी बहिण आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या गावातील जमीन ही संयुक्त कुटुंबाची वडीलोपार्जित जमीन आहे. हे म्हणणे खरे की, वाटणीपत्रापुर्वी प्रतिवादी क्रमांक २ ने वाद मिळकतीमध्ये सदनिका खरेदी केली.

१९. हयावेळी साक्षीदाराला त्याने दाखल केलेल्या विक्रीकराराची प्रत दाखवली. त्यामुळे सदर विक्रीकरारास **निशाणी ७३** देण्यात येते. हे खरे की, निशाणी ७१ नुसार सदरची मिळकत हस्तांतरीत करण्यात आली. हयावेळी साक्षीदाराला दिनांक १२.०३.२०१८ रोजीचे हक्कसोडपत्र दाखविण्यात आले त्यामुळे त्याला **निशाणी ७४** देण्यात येते. हे खरे की, त्यानंतर सदरची मिळकत हक्कसोडपत्राद्वारे माझ्या नावे करण्यात आली.

२०. हयावेळी साक्षीदाराला दिनांक २६.०५.२०१६ रोजीचे वाटणीपत्र दाखविण्यात आले त्यामुळे त्याला **निशाणी ७५** देण्यात येते. सदरचे वाटणीपत्र कुणाच्या मार्फत तयार केले ते मला माहित नाही. साक्षीदार सांगतो की, ते वडीलांनी बनवले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्हा कुणालाही वाटणीपत्रातील मजकुराबाबत काहीही माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर वाटणीपत्र (निशाणी ७५) नोंदणीकृत करण्यापुरतेच आम्ही वादीला मुंबईवरुन बोलावुन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, वाटणीपत्र नोंदणीकृत केल्यानंतर त्याची प्रत आम्ही तिला वाचायलाही दिली नाही किंवा तशी प्रत दिल्याबाबत तिच्याकडुन कोणतीही पोहोच घेतली नाही. वाटणीपत्रावर वादीने स्वखुशीने सही केली व तिला वाटणीपत्र वाचुन दाखवले होते हे दाखविण्यासाठी मी न्यायालयात वाटणीपत्रावरील साक्षीदार आणु शकतो. हे खरे नाही की, मी कुटुंबात मोठा असल्याने व माझा कुटुंबावर वचक असल्यामुळे मी वादीवर दबाव टाकुन वाटणीपत्रावर तिची सही घेतली.

२१. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीतील सदनिका संयुक्त कुटुंबातील असुनसुध्दा मी हेतुपुरस्पर वाटणीपत्रात वादीचा उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की,

वादीने तिच्या वाटणीमध्ये आलेल्या जमीनीमध्ये काय पिकते असे मला विचारल्यावर मी तिला हसुन त्यामध्ये गवत सुध्दा पिकत नाही असे म्हणले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरची बाब कळल्यानंतर वादीने मला वाटणीपत्राची प्रत मागितली व त्यावेळी मनात नसतांनाही मी ती प्रत वादीला दिली. हे म्हणणे खरे नाही की, वाटणीपत्रानुसार वादीला जमीन दिली असे दाखविण्यासाठी तिच्या नावे अल्पसा वाटा देउन, उर्वरित सर्व जमीन आम्ही आमच्या वाटयाला आली असल्याचे नमुद केले. हे म्हणणे खरे नाही की, आमच्याकडे आलेल्या हिश्श्यात आम्ही उस आणि बागायती करतो व तिच्याकडे असलेल्या हिश्श्यात गवत सुध्दा उगवत नाही.

२२. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वादीला समान हिस्सा दिला हे दाखविण्यासाठी वाटणीपत्रामध्ये तिला तसा हिस्सा दिल्याचे नमुद केले आहे. वाटणीपत्रामध्ये मला मिळालेला हिस्सा मी बहिणीला देण्यास व तिला मिळालेला हिस्सा मी घेण्यास तयार नाही. हे म्हणणे खरे की, वादीने मला हिस्सयासंबधी बरीच पत्रे पाठवली आहेत. हे खरे की, वादीने मला कायदेशीर नोटीस पाठविलेल्या आहेत. हे मला माहित नाही की, दुय्यम निबंधक कार्यालयात सदरचे दस्त बेकायदेशीर आहे असे वादीने कळवले किंवा कसे. हे मला माहित नाही की, मी नोटीसीची दखल घेतली नाही म्हणुन वादीने पोलिस ठाण्यात तक्रार केली किंवा कसे. हे खरे की, वादीने माझ्याविरुध्द उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

२३. हे म्हणणे खरे नाही की, दावा प्रलंबित असतांना सुध्दा मी दावा मिळकतीमधुन लाखो रुपये कमावले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादीला तिचा कायदेशीर हिस्सा देणे लागत असुन सुध्दा आम्ही वादीवर अन्याय केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरण प्रलंबित असतांना सुध्दा वाद मिळकत आम्ही आमच्या नावे करुन घेतली. हे म्हणणे खरे की, महसुल विभागात सुध्दा एक दावा प्रलंबित आहे.

२४. हे म्हणणे खरे नाही की, वाटणीपत्रात मी एक जमीन स्वतः विकत घेतली आहे असे नमुद केले आहे ते खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जमीन विकत घेतली त्यावेळी माझ्या उत्तपन्नाचे साधन नव्हते. हे खरे की, माझी स्वतःची जमीन असुन देखिल मी त्यामध्ये

दोन भावांचा हिस्सा दाखवला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी हेतुपुरस्पर वादीचा त्यामध्ये हिस्सा नाकारला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीमध्ये मी जाणिवपुर्वक वादीला हिस्सा दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

समक्ष श्रवणोत्तर स्विकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by
JAGDISH SHANKARRAO
KOKATE
Date: 2026.04.22
14:59:38 +0530

(जे. एस.कोकाटे)
६वे सह दिवाणी न्यायाधीश
वरिष्ठ स्तर, कल्याण

कल्याण
दिनांक : २२.०४.२०२६